
10



Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized

# One day Interdisciplinary National Conference on Contemporaneity of Gandhian Thoughts: Reality & Distortion

## 1st October, 2019



Organized By:

**Department of Political Science**

Shri Sharda Bhavan Education Society's

**Rajiv Gandhi Mahavidyalaya,**

**Mudkhed, Dist. Nanded- Maharashtra -India**

Edited by

Dr Ramesh Kadam

Dr Dattaji H. Mhetre



311

२५. महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार-आकाश शेषराव बांगर ६८

२६. महात्मा गांधीजींचे राजकीय विचार - अनघा देशमुख ७०

२७. महात्मा गांधीजीचे राजकीय विचार : एक अभ्यास- प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे ७२

२८. 'सत्याग्रह' एक शास्त्र- डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील ७६

२९. महात्मा गांधीजीचे शैक्षणिक विचार- प्रा.डॉ. बोचरे जे.एम. ७९

३०. महात्मा गांधी यांच्या विचारातील राजकीय संदर्भ-प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव ८२

३१. महात्मा गांधीजी आणि राष्ट्रवाद-प्रा.चव्हाण देविदास गोविंदराव ८६

३२. स्वावलंबी ग्रामस्वराज्याचे उद्‌गाते : म. गांधी- डॉ. शिवाजी हरी चौगुले ८८

३३. महात्मा गांधीजीचे सामाजिक विचार - देशमुख गंगाधर बालाजीराव ९१

३४. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांचे तुलनात्मक विचार - प्रा.डॉ. बनसोडे विलास भारतराव ९३

३५. महात्मा गांधीचे विचार आणि २१ व्या शतकातील आंतराष्ट्रीय वाद आवस्था-डॉ. भांगे चंद्रकांत बन्सीधर ९६

३६. म.गांधीजीचे शैक्षणिक विचार-प्रा.पांडुरंग नेवरकर ९९

३७. महात्मा गांधीजीचे राजकीय विचार- प्रा.डॉ.विलास कऱ्हाळे १०१

३८. गांधी आणि मार्क्स यांच्या अराज्यवादी विचारांची तुलना-डॉ.फुके वृषाली लक्ष्मीकांत १०३

३९. महात्मा गांधीजीच्या विचाराची मौलिकता-डॉ.राम फुन्ने १०६

४०. महात्मा गांधी यांच्या विचारांची सद्यकालीन प्रस्तुतता-डॉ.गणेश गंगाधर शिंदे १०८

४१. महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार एक सिंहावलोकन-प्रा.डॉ.हारगे महादेव माणिकराव ११०

४२. गांधीवाद आणि आंबेडकरवादामधील अंतस्थ भेद- प्रा.डॉ. आनंद गो. इंजेगावकर ११२

४३. महात्मा गांधी सनातनी हिंदू आणि दुटप्पी होते; असे आंबेडकराना का वाटायच :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ फेब्रुवारी १९५५ ला बी.बी.सी.
रेडीओला दिली मुलाखत. - प्रा. डॉ. जे. टी. कांबळे ११४

४४. 'महात्मा गांधीचे सामाजिक, राजकीय व शैक्षणिक विचार'-जयश्री पंडीतराव पोटपल्लेवार ११८

४५. गांधीवाद आणि मार्क्सवाद -डॉ ज्योती व्ही. कवठे १२१

४६. महात्मा गांधीजी आणि शाश्वत विकास-प्रा. केदार रविंद्र केंद्रेकर १२५

४७. महात्मा गांधी आणि महिलांचे सबलीकरण-प्रा. सविता कोकाटे परांडे १२७

४८. महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार-डॉ.पी.एस.लोखंडे १२९

ISBN : 978-81-922248-8-6

# महात्मा गांधीजींचे राजकीय विचार

सहाय्यक प्राध्यापिका अनघा देशमुख
सोनोपंत दांडेकर कॉलेज

भारताचे राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी हे राजकीय विचारवंत नव्हते, त्यांनी आपले राजकीय विचार कुठल्याही पुस्तकात मांडले नव्हते. तर गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी जनतेला जे मार्गदशन त्यांच्या वर्तमानपत्रातून केले, गांधीजींचा जीवन प्रवास, गांधीजीनंनी स्वातंत्र्य लढ्यावेळी अहिंसेचा जो मार्ग स्वीकारला त्यात गाधीजींचे राजकीय विचार स्पष्ट होतात.

`गांधीजींचे राजकीय विचार हे त्यांची स्वराज्याची संकल्पना, मूल्यावर आधारित राजनीती, रामराज्य, अस्पृशतेला विरोध, ग्रामाधरीत शासन व्यवस्था, गांधी विचारांचा भारतीय राज्यघ□नेवरील प्रभाव इत्यादीवरून लक्षात येते. संपूर्ण गांधी विचार हे सत्य आणि अहिंसा या महात्मा गांधीजींच्या दोन संकल्पना वर अवलंबून आहे. गांधीजींचे राजकीय विचार देखील गांधीजींच्या या दोन संकल्पनांवर अवलंबून आहे.

गांधीजींच्या मते राजकारण हे भौतिक सुख मिळवण्याचे साधन नाही तर सामाज सेवा करण्याचे एक साधन आहे. ज्या व्यक्तीला राजकारणात सहभाग घ्यायचा आहे त्या व्यक्तीने व्यक्तिगत स्वार्थ व वर्गगत स्वार्थ याचा त्याग करायला हवा व त्याला उच्च पातळीवरचे जीवन जगता आले पाहिजे. राजकारणाला वर्ग-स्वार्थ आणि व्यक्तीस्वार्थ □ळता येत नसेल तरी किमान कुणाचेही अहित होणार नाही याची काळजी तरी त्याने घ्यायला हवी. गांधीजींनी व्यक्तीच्या आंतरिक परिवर्तनावर भर दिलेला आहे कारण गांधीजींच्या मते व्यक्ती व्यक्तीने समाज बनतो त्यामुळे जर प्रत्येक व्यक्तीचे परिवर्तन झाले जर संपूर्ण समाजाचे परिवर्तन होईल. गांधीजींच्या मते 'ज्या समाजात व्यक्तीचा विकास सर्व प्रकारच्या संकुचीतेताचा त्याग करून करण्याची संधी मिळते तो आदर्श समाज होय. असा समाज हळूहळू स्वतःची आदर्श राजनीती निर्माण करतो व ती अमलातही आणतो.

राज्य मुल्याधीष्टीत कसे असावे या संदर्भात गांधीजींनी रामराज्याचे उदाहरण दिले आहे. रामराज्य म्हणजे रामाचे राज्य. राम राज्य म्हणजे लोकमताचा सर्वोच्च आदर करणारे राज्य. त्यात राजाच्या आकांक्षेपेक्षा जनतेच्या आकांक्षेला अधिक महत्व आहे. राजा हा सर्वतोपरी नाही, तर जनता ही सर्वतोपरी असते. गांधीजींच्या रामराज्याचा संदर्भ हा पौराणिक नाही, तर तो आधुनिक आहे. गांधीजींची ही संकल्पना आधुनिक आहे कारण पौराणिक संकल्पनेत राजा हा सर्वोच्च होता तर गांधीजींच्या संकल्पनेत प्रजा ही सर्वोच्च आहे. गांधीजींनी एके ठिकाणी म्ह□ले आहे "माझ्या कल्पनेतील स्वातंत्र्य म्हणजे रामराज, अर्थात पृथ्वीवरील ईश्वरी राज्य." गांधीजींच्या मते स्वातंत्र्य हे राजकीय, आर्थिक व न□तिक असले पाहिजे. 'राजकीय' स्वातंत्र्यामध्ये परकीय स□ाचा कोणत्याही स्वरुपात देशावर असलेला ताबा नाहीसा झालाच पाहिजे. मग तो ताबा लष्करी, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक या कुठल्याही प्रकारचा असला तरी तो नाहीसा झाला पाहिजे. 'आर्थिक' स्वातंत्र्य म्हणजे परकीय भांडवलवाले व त्यांचे भांडवल यापासून, तसेच त्यांचेच या देशातील या देशातील भाऊबंद जे देशी भांडवलवाले आहेत यांच्यापासून सर्वस्वी मुक्तता. अशा प्रकारच्या स्वराज्याला गांधीजी रामराज्य म्हणतात.

स्वराज्याचा शब्दशः अर्थ आपला स्वतःचा राज्यकारभार आपण स्वतः पाहणे हा होतो. पण गांधीजींच्या मते स्वराज्य या संकल्पनेचा अर्थ फक्त स्वतःचा राज्यकारभार स्वतः चालवणे इतका मर्यादित नाही. गांधीजींच्या मते फक्त इंग्रज सरकारच्या हातून भारतीयांच्या हाती सत्ता येणे म्हणजे स्वराज्य नव्हे तर गांधीजींच्या मते राज्यातील लोकांमधील ऐक्य, आतल्या व बाहेरच्या आक्रमणापासून मुक्ती आणि सामान्य लोकांच्या आर्थिक परीस्थित्त उत्तोरोतर सुधारणा या गोष्टी स्वराज्यात महत्वाच्या असतात. स्वराज्याची पहिली बाजू म्हणजे 'अर्थसिद्धी' होय. स्वराज्यात कोणाचीही उपासमार होतु नये. समाजातील सर्व स्तरातील लोकांना त्याचे पो□ भरण्यसाठी काम व रोजगार मिळवण्याची संधी स्वराज्यात असावी. स्वराज्याची दुसरी बाजू म्हणजे 'राजकीय स्वातंत्र्य'. हिंदुस्थानासाठी इथल्या लोकांसाठी उपयुक्त ठरेल अशी शासन व्यवस्था असावी. स्वराज्याची तिसरी बाजू म्हणजे 'न□तिकता किंवा सामाजिक स्वातंत्र्य.' स्वातंत्र्य असेल पण राजकारणी व्यक्तींमध्ये न□तिकता नसेल तर त्या स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही. स्वराज्याची चौथी बाजू म्हणजे 'धर्म'. कारण गांधीजींच्या मते धर्माशिवाय बाकीच्या तीन बाजू उभ्याच राहू शकत नाही.

ISBN : 978-81-922248-8-6

गांधीजींच्या मते अस्पृश्यता हा स्वराज्याच्या मार्गातील एक खूप मोठा अडथळा आहे. स्वराज्यासाठी हिंदू मुसलमान ऐक्य इतकेच अस्पृशता निरावरण महत्वाचे आहे. जो पर्यंत या देशातील अस्पृश्यांना त्याचे स्वातंत्र्य परत मिळता नाही तो पर्यंत स्वराज्य निर्माण होणार नाही. ईश्वराची सेवा करणे, ईश्वराची कृपा मिळवणे हा प्रत्येक मानवाचा अधिकार आहे. त्यावर कुठल्याही विशिष्ट अशा मानवसमाजाची मक्तेदारी असणे हे अन्याय आहे.

गांधीजींना असे शासन हवे होते कि ज्याचा केंद्रबिंदू मुख्यतः खेडे हे असेल. गांधीजींनी गावाकडे चला हा संदेश दिला होता. ग्रामीण अर्थ्याव्यावास्ठ ही परिपूर्ण असावी. प्रत्येक गावात तेथील लोकांना आवश्यक असणाऱ्या गराजाची पूर्तता करणाऱ्या सर्व गोष्टींचे उत्पादन झाले पाहिजे म्हणजे गाव स्वयंपूर्ण होतील.

गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात फार मोठी मोलाची कामगिरी बजावली होती. त्यांनी सर्व लोकांना एकत्र करून इंग्रज सत्ते विरुद्ध लढा दिला होता. त्यामुळेच गांधीजींच्या विचारांचा भारतीय राज्यघ⃞नेत फार मोठा प्रभाव आहे. तो पुढील प्रमाणे:

भारतीय राज्यघ⃞नेच्या VI व्या भागात पुढील मार्गदर्शक तत्वे हे गांधी विचारातून घेण्यात आलेले आहेत.

१) स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती १९९२

२) आंतरराष्ट्रीय प्रश्न शांतीच्या मार्गाने सोडवणे

३) शेजारील राष्ट्रांशी सती व साखोल्याचे संबंध.

संदर्भ ग्रंथ

१) गांधी विचार दर्शन – संपा भाऊ धर्माधिकारी

२) गांधी विचार – डॉ शहा

३) The Essence of Hinduism -Mahatma Gandhi

४) https://en.wikipedia.org/wiki/Mahatma_Gandhi


ISBN : 978-81-922248-8-6